
Impact Factor-7.675 (SJIF) ISSN-2278-9308

# B.Aadhar

## Peer-Reviewed Indexed

**Multidisciplinary International Research Journal**

**September -2020**






**Chief Editor**
Prof. Virag S. Gawande
**Director**
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Editor:**
Dr.Dinesh W.Nichit
**Principal**
Sant Gadge Maharaj
Art's Comm,Sci Collage,
Walgaon.Dist. Amravati.

**Executive Editor:**
Dr.Sanjay J. Kothari
Head, Deptt. of Economics,
G.S.Tompe Arts Comm,Sci Collage
Chandur Bazar Dist. Amravati

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.aadharsocial.com

Aadhar Publications

# INDEX


| No. | Title of the Paper / Authors' Name | Page No. |
|---|---|---|
| 1 | A Study on Use &Purchasing Behavior of working men & women regarding Cosmetics **Dr. Gokula .Y. Dhokey (Dr.G. A. Bhalerao)** | 1 |
| 2 | Comparison of Balance, Coordination and Reaction Time of Football and Volleyball Players". **Dr. Sugandh Band** | 7 |
| 3 | Stress Management : Desideratum of New Era **Kashmira Avin Hadke** | 11 |
| 4 | The Role of Libraries in inculcating the Reading Culture Among the People of Nashik City **Milind.R. Thorat[1], Dr. Sanjay D. Khairnar[2], Dr. Madhukar V. Patil[3]** | 16 |
| 5 | A Problems By Farmers In Nagpur District. **Dr. Atul P. Naik** | 18 |
| 6 | Comparative Study of Fat Percentage and Muscle Mass of College Students of Pusad and Umarkhed Taluka **Pradeep Kacharuji Ingole** | - 23 |
| 7 | An Anthology of Research Studies on the Mahatma Gandhi National Rural Employment (MGNREGA) **Dr. Sandhya O. Wankhede** | 26 |
| 8 | महात्मा गांधी व त्यांचे ग्रामस्वराज प्रा. आशिष ब.पेठे | 30 |
| 9 | भारतातील लिंग गुणोत्तरांचा तुलनात्मक अभ्यास. प्रा.चव्हाण ए.डी. | 34 |
| 10 | मराठवाड्यातील आंबेडकरोत्तर दलित चळवळीचा संक्षीप्त आढावा प्रा.गौतम कांबळे | 38 |
| 11 | संत समाजसुधारकांचा वैज्ञानिक दृष्टिकोन डॉ.गजानन मुंधे | 40 |
| 12 | महाराष्ट्रातील धनगर जमतीच्या आरक्षणाचा प्रश्न समजून घेताना प्रा.डॉ.कांतराव पोले | 44 |
| 13 | रणरागिणी सरसेनापती उमाबाईसाहेब दाभाडे यांचे कतृत्व प्रा. लाभेश सा. साबळे | 48 |
| 14 | कोविड–१९ चे भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम सुधिर शरदचंद्र मुळे | 51 |
| 15 | "कृषि विकास का पर्यावरण पर प्रभाव ",जिला भिण्ड (म.प्र.)एक भौगोलिक अध्ययन डॉ. रामवीर सिंह सिसौदिया | 55 |
| 16 | तांडा आणि अंधश्रद्धांचा विळखा डॉ. विजय जाधव | 61 |
| 17 | ग्राम धोत्रा नंदई ता. देऊळगाव राजा येथील ऐतीहासिक महादेव मंदिराचे अध्ययन : एक चिकित्सा डॉ. किशोर मारोती वानखडे | 66 |
| 18 | ग्रंथालय व्यवस्थापन आणि महाविद्यालयीन प्रगती प्रा. डॉ. सुर्यकांत जाऊळकर | 70 |

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - ( (SJIF) -7.675, Issue NO, 244 (CCXLIV)
ISSN : 2278-9308
September, 2020



| | | |
|---|---|---|
| 19 | महानुभावांचे पद्य वाङ्मय : श्रध्दा आणि भक्तीचे प्रतिबिंब<br>डॉ. केशव के. गाडबैल | 75 |
| 20 | राज्य आणि राजकीय व्यवस्थेचा अभ्यासक - प्लेटो डॉ. संभाजी संतोष पाटील | 79 |
| 21 | उच्च माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या बुध्दिमत्ता, सर्जनशीलता, अभिरूचीचा त्यांच्या उत्तीर्णतेवर होणाऱ्या परिणामांचा तुलनात्मक अभ्यास कु. स्नेहा नरेशराव ढांगे / प्रा.डॉ. सौ. किरण नागतोडे | 85 |
| 22 | मानवी वर्तन आणि भारतीय संविधान डॉ. दिनेश चं. निकाळजे | 90 |
| 23 | वैदर्भीय दलित कवयित्रीची कविता रू एक आकलन<br>(विशेष संदर्भ– ज्योती लांजेवार, आशा माधव अंभारे, सुरेखा भगत, नंदा तायवाडे यांची कविता ) डॉ. प्रफुल्ल गवई | 95 |
| 24 | म. गांधीजी के तत्वविचार और राजनीतिक परिवर्तन प्रा. डॉ. जगदेव ज. जाधव | 106 |
| 25 | ई– कॉमर्स ची व्याप्ती आणि मर्यादा कु. महिमा अनिलराव शेवणे | 109 |
| 26 | भारतीय लोकसंख्यावाढ – परिणाम आणि उपाय नंदिनी राजकुमार बरतेरे | 113 |
| 27 | मानसिक आरोग्य कु. प्रियंका प्र. सागोरकार/प्रा. अरुणा वाडेकर | 117 |
| 28 | सरकारच्या कल्याणकारी योजना पुनम संजय भातकुलकर | 122 |
| 29 | भारतीय स्टार्टअप – एक चिकित्सक अध्ययन<br>सना अंजुममेहबूबअली शाहा | 126 |
| 30 | ई- गव्हर्नन्सवर विकासाचा प्रभाव सायली राजेंद्र अंदुरकर | 131 |
| 31 | मेक इन इंडिया – औद्योगिक विकासातील संधी वैष्णवी बळीराम डुंबरे | 134 |

# वैदर्भीय दलित कवयित्रीची कविता : एक आकलन

## (विशेष संदर्भ- ज्योती लांजेवार, आशा माधव अंभारे, सुरेखा भगत, नंदा तायवाडे यांची कविता )

डॉ. प्रफुल्ल गवई
एस पी एम कॉलेज चिखली,बुलढाणा

**प्रस्तावना :**

'दलित साहित्य'ने जागतिक साहित्यात वेगळी ओळखनिर्माण केली आहे. ह्या साहित्याने दावलेल्या समुहाचा आवाज प्रभावी मांडला आहे. दलित लेखका बरोबर दलित लेखिकानी सुद्धा आपली व्यथा, वेदना आणि व्यवस्थे विरोधात विद्रोह मांडला आहे. विदर्भ ही बाबसाहेबांची धम्माच्या क्रांतिची भूमी आहे, नागवंशाचा प्राचीन वारसा ह्या मातीला आहे.अश्या वैदर्भिय भूमीत दलित स्त्रियांनी आपल्या कवितेची शेती फुलवली आहे. या शोधनिबंधाच्या माध्यमातून ज्योती लांजेवार, आशा माधव अंभारे, सुरेखा भगत, नंदा तायवाडे यांच्या कविते विषयी आकलन मांडले आहे.

**ज्योती लांजेवार यांची कविता**

ज्योती लांजेवार हे दलित साहित्य विश्वातील महत्वाचे नाव आहे. त्यांचे आतापर्यंत दिशा, 'अजून वादळ उठले नाही, 'शब्द निळे आभाळ' इत्यादी काव्यसंग्रह प्रकाशित असून 'दलित साहित्य समीक्षा', 'समकालीन साहित्य प्रवृत्ती आणि प्रवाह, 'दलित वाङ्मयाचा इतिहास' इत्यादी समीक्षात्मक साहित्य प्रकाशित आहे. त्यांना साहित्य सेवेबद्दल १९९१-९२ चा के. 'बा. सि. मर्ढेकर पुरस्कार' प्राप्त झाला असून त्यांच्या अनेक कवितांचे भारतीय भाषेत व इंग्रजी,रशियन भाषेत भाषांतर झाले आहे. भारतातील अनेक विद्यापीठात तसेच जर्मनीच्या हेडिलवर्ग विद्यापीठात त्यांच्या कविता अभ्यासक्रमात समाविष्ट आहेत.

डॉ. आंबेडकर कवयित्रीचे 'प्रेरणास्थान आहे. म्हणून त्या म्हणतात,

'बाबासाहेब,
आमच्या एकुलत्या एक आभाळाचा
तू चंद्र आहेस.
ज्यांच्या आयुष्यालाच ग्रहण लागले
अशांचा तू सूर्य आहेस / आमच्या अनाथ जिन्दगीचा
तू श्वास आहेस
आमच्या डोळ्यातील आसवांचा
तू राजहंस आहेस'
(शोधपर्व, पृ.क्र. ५)

बाबासाहेब यांना 'राजहंस','सूर्य' प्रकाशाचे प्रतीक असल्याचे कवयित्री संबोधते आहे.

'बाबासाहेब,
कोणीच हिसकावू शकणार नाही
आमच्या भविष्याच्या ओठांवरची गाणी अंधार जाळीत उगवणाऱ्या/प्रलयंकारी सुरांची मी निशाणी
(शोधपर्व, पृ.क्र. २३)

एकूणच डॉ. आंबेडकरांशी संवाद साधत कवयित्री स्वचिंतन, समूह चिंतन करतांना आपणाला जाणवते तसेच अस्पृश्य व स्त्री म्हणून आलेला उपेक्षित अनुभव कवयित्री शब्दबद्ध करते. आपल्या कवितेची भूमिका विशद करतांना 'अजून वादळ उठले नाही' ह्या काव्यसंग्रहाच्या मनोगतात कवयित्री म्हणते, "करपलेली जीवनमूल्ये आणि सांस्कृतिक मूल्ये, अवनती आणि अधःपतन, डोळ्यावर कातडे ओढून जगणारी पिलावळ, एका सूर्याच्या प्रखर तेजाने सतेज कावी, सामाजिक आणि राजकीय दिवाळखोरी सोबतच सोन्याच्या पिंजऱ्यात समानता, बंदिस्त, रेषा न ओलांडता हरण होते स्त्री, विशाल प्रेरणा असूनही बुरख्याआड आकुंचित, मर्यादित नगर, मानवमुक्तीचा गजर तरीही बंधुभावाचा विसर, सामान्यांचे स्वप्न बाण्यावर, स्थैर्य नाही ठाण्यावर, मातीआडची जीर्ण चळवळ, स्पर्धेसाठी उथळ चळवळ, हे सारखे जीवघेणे उठवतात हृदयावर बळ, जेव्हा अस्वस्थ होऊन या साऱ्यांशी झुंजावे तेव्हा हलकेच वेदना-संवेदनां चे ओझे कवितेच्या हाती देवून मोकळे व्हावे."१ जननी जन्मभूमी' या भावतच्या निमित्ताने ज्योती लांजेवर यांनी आपल्या कष्टकरी वर्गातील 'आई' ची प्रतिमा उभी केली आहे. लांजेवार म्हणतात,

'आई तुझा लक्तरलेला पदर मला
राष्ट्रध्वजाइतका प्रिय वाटतो / तुझ्या कपाळावरील कुंकवात
अशोक चक्राचा भास होतो / तुझ्या स्वप्नांची शिखरे
हिमालयाहून उत्तुंग / स्वाभिमानाला आहेत गरुडाचे पंख
तुझ्या श्रमिक हातावरचे घट्टे आहेत क्रांतीचे उद्गाते
(जननी जन्मभूमी, पृ.क्र.१)

कवयित्रीला आपली आई श्रमिक वर्णातील क्रांतीकारक नायिका वाटते. 'श्रमिक हातावरचे घट्टे कवयित्रीला 'क्रांतीचे उद्गाते' वाटते है महत्वाचे आहे. येथे कष्टाविषयीचा सन्मान व्यक्त झाला आहे. देशाच्या राजकीय व्यवस्थेची जी ऐतिहासिक प्रतीके आहेत. ती सर्व प्रतीके कवयित्रीला तिच्या 'आई' मध्ये दिसतात. या संपूर्ण प्रतीकांच्या माध्यमातून आई विषयीचा सन्मान व्यक्त झाला आहे.

'या देशाची तू मूळ संस्कृती / तरी गावकुसाबाहेर तुझी वस्ती घाम गाळून पिकवाव्या सोन्याच्या राशी
तरी हा मातीचे तुला ठेवावे उपाशी?
तू तर जननी जन्मभूमी
तरी तुझ्यासाठी अपुरी इथली भूमी?'
(जननी जन्मभूमी, पृ.क्र. ९)

कवयित्रीला आपली आई श्रमिकवर्गातील क्रांतीकारक नायिका बाटते. 'श्रमिक हातावरचे घट कवयित्रीला क्रांतीचे उद्गाते वाटते हे महत्वाचे आहे. येथे कष्टाविषयीचा सन्मान व्यक्त केला आला आहे. देशाच्या राजकीय व्यवस्थेची जी ऐतिहासिक प्रतीके आहेत. ती सर्व प्रतीके कवयित्रीला तिच्या 'आई' मध्ये दिसतात. या संपूर्ण प्रतीकांच्या माध्यमातून आई विषयीचा सन्मान व्यक्त झाला आहे.

'या देशाची तू मूळ संस्कृती/ तरी गावकुसाबाहेर तुझी वस्ती
घाम गाळून पिकवाव्या सोन्याच्या राशी
तरी या मातीने तुला ठेवावे उपाशी?
तू तर जननी जन्मभूमी
तरी तुझ्यासाठी अपुरी इथली भूमी? '
(जननी जन्मभूमी, प्र.क्र. ९)

श्रम करणाऱ्या कष्टकरी वर्गाच्या पदरात उपेक्षाच' पडली असल्याचे कवयित्री नोंदवते. साधन संपतीमध्ये देखील इथल्या कष्टकरी वर्गाला वाटा भेटला नाही. उलट उपेक्षाच वाट्याला आली असल्याची खंत कवयित्रीने कवितेच्या निमित्ताने मांडली आहे. कवयित्री आपल्या 'आई' लाच प्रश्न करते.

'तू कधीच दिसली नाहीस
नव्या कोऱ्या जरीकाठी इरकली लुगड्यात
(तू कधीच दिसली नाहीस. पृ.क्र. ११)

कवयित्रीला आपली आई कधीच समृद्ध दिसली नाही. तिच्या वाट्याला सुंदर जीवन आले असे कवयित्रीला आपली आई सतत दुःख कष्टी असलेली वेगळ्याच रुपात दिसली आहे.

'तू दिसलीस मला
डोळ्यांत आसवांचा पावसाळा
जन्मभर जाळतो उन्हाळा
डोईवरचा सूर्य खाली उतरताना /कापूस वेचून औटी ठेवीत पाती मागून पात चालताना
चिल्यापिल्यांचे भविष्य घडवताना'
(तू दिसलीस मला, पृ.क्र.१७)

अहोरात्र कष्ट करत परिस्थितीशी झगडत असलेली 'अश्रू' ची वाटेकरी, चिल्यापिल्याच्या भविष्यासाठी राबणारी, अशी अवस्था आपल्या भारतीय स्त्रीच्या वाट्याला आलेली आहे. या कवितेच्या माध्यमातून व्यक्त करीत आहे. तरीही 'आंबेडकरावाणी होजो बापा' अशी नव्या यांना प्रेरणा देणारी ही आई आहे. चळवळीत आपली भागीदारी उचलणारी अशी चळवळीतील लांजेवार यांची 'आई' आहे.

"तु दिसलीस मला
'लॉंगमार्चमध्ये' पुढे चालून
'नामांतर झालेच पाहिजे' म्हणताना
पोलीस दंडुका हातावर झेलून
ताठ मानेने कारागृहात जाताना
एकुलता एक पोटचा गोळा
गोळीबारात शहीद झालेला पाहून
'अरे तू भीमासाठी मेलास'
जन्माचे चीज झाले
दोन चार असते लई भलं असत'
अस पोलीस अधिकाऱ्याला ठणकावून सांगतांना"
(तू कधीच दिसली नाहीस, पृ.क्र. १)

स्वाभिमानी लढाऊ चळवळीचे भान असलेली आई लांजेवार यांनी आपल्या कवितेत उभी केलली आहे. एकूणच 'आई' च्या निमित्ताने व्यक्त झालेल्या कवितेमधून भारतीय स्त्रीची व्यक्तीरेखा रेखाटली आहे.

ज्योतीताई लांजेवार यांच्या 'प्रियदर्शनी इंदिरा गांधी' या कवितेतून भारतीय इतिहासातील अत्यंत प्रभावी व्यक्तिरेखा चितारली आहे. एक मोठा विश्वास 'इंदिरा गांधी' विषयी व्यक्त झाला आहे. कवितेच्या सुरुवातीलाच कवयित्री म्हणते,

प्रियदर्शनी, इंदिरा
तुझ्या दर्शनाने मी पाहिला
माझ्या प्रिय देशाचा इतिहास
इथल्या सडक्या रुढीवर स्वार होऊन
संभाळलीस या देशाची बागडोर
क्रांतीकारी मशालींना पेटवणारी तू
झालीस अखंड ज्योत
(प्रियदर्शनी-इंदिरा गांधी. पृ.क्र. ३८)

या ठिकाणी 'क्रांतीकारी व्यक्तिमत्व' म्हणून 'इंदिरा गांधी' पुढे येतात.

'मला तुझे गाणे क्रांतिपर्वची समाधी वाटते
आता झालीच कुणी मशाल इथे
तर-प्रिये, इतिहास घडवणारे तुझे हात
पुन्हा या देशाला लागतील का?
गोरगरिबांच्या डोळ्यातील आसवे पुसणारा
कोणता पदर या देशात पुन्हा दिसेल का?
(प्रियदर्शनी इंदिरा गांधी, पृ.क्र. ३९)

येथे इंदिरा गांधींच्या जाण्याने कवयित्री हळहळली असल्याचे गोरगरिबांच्या डोळ्यातील आसवे पुसणारा कोणता पदर या देशात पुन्हा दिसेल का? असा प्रश्न हळव्या अंतःकरणाने कवयित्री उपस्थित करताना दिसते. या ठिकाणी एक सक्षमपणे नेतृत्व करणारी, अखंड भारत एक ठेवणारी, क्रांतिकारी स्त्री दिसून येते. आजपर्यंत स्त्रियांवर धर्मव्यवस्थेने जबाबदारीच टाकली नाही, निर्णयच घेऊ दिले नाही. पण आपल्यातील एक स्त्री देशाच्या केंद्रस्थानी जावून हे सारे करीत आहे. याचा सार्थ अभिमान इंदिरा गांधीच्या निमिताने कवयित्रीने व्यक्त केलेला आहे.

थोडक्यात लांजेवार यांची कविता डॉ. आंबेडकर या प्रेरणास्त्रोशी संवाद करणारी 'अजून वादळ उठले नाही' च्या निमिताने नव्या आंदोलनाची वाट पाहणारी, एक सुशिक्षित भारतीय दलित स्त्रीची ही कविता म्हणजे मनोगतच आहे असे म्हणणे वावग ठरणार नाही.

**आशा माधव अंभारे यांची कविता**

आशा अंभोरे यांनी अमरावती येथे शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्थत मराठी विषयाच्या प्रपाठक म्हणून कार्य केले आहे. त्यांना फुले-आंबेडकरी साहित्य चळवळीतील कवयित्री व वैचारिक लेखिका म्हणून नावलौकिक प्राप्त आहे. 'मराठी लोकसाहित्यातील दलित जीवन' या विषयावर त्यांनी आचार्य पदवी प्राप्त केली आहे. 'पानगळ' हा त्यांचा पहिला काव्यसंग्रह १९८१ मध्ये प्रकाशित झाला आहे. काही कविता 'युगाचे हुंदके' या समकालीन दलित कवयित्रीच्या प्रातिनिधिक कवितासंग्रहात समाविष्ट आहेत. "जो समाज पानगळ जगत आला त्यास', या शब्दात आपल्या समाजाप्रती त्यांनी पानगळ या कवितासंग्रहाच्या अर्पणपत्रिकेमध्येच कृतज्ञता व्यक्त केली आहे.

'प्रतिक्षा' या कवितेत दुनियेची गाऱ्हाणी त्यांनी मांडली आहे. कवयित्री म्हणतात,

'आपल्या अर्भकांना गिळतात सर्पिनी
बोकेही घेतात आपल्याच नवजात नरांच्या
नरडाची घोट
व्यभिचारी दुनियेत असेच घडते रोज

असा कवयित्रीला रोजचा व्यभिचार माहीत आहे. हे एवढ्यावरच संपत नाही तर,

'खुडल्या जातात सकाळचे सूर्य रोज
सौद्याच्या बाजारात'

सकाळच्या सूर्याच्या वाट्याला काय येते? खुडणे येते. असे रोजच्या जगणाऱ्याच्या वाट्याला हे सर्व येते. आणि 'आमचे जग उष्ण वाऱ्याच्या क्रूर सळांनी जाळले जाते, असा पोरकेपणाचा अनुभव कवयित्री शब्दबद्ध करते.

'पृथ्वीवर पाय, दिशाभर पसरले हात
प्रलयकारी संदेशाची वाट पाहात'
(प्रतिक्षा. पृ.क्र. ४)

केव्हातरी आमच्या दुःखाचा अंत होईल, केव्हातरी बदल होईल, आमचे जग बदलेलच अशी प्रतीक्षा असलेल्या कवयित्रीला 'प्रलयकारी संदेशाची' प्रतिक्षा आहे. या ठिकाणी दुःख मुक्तीची वाट पाहणारी कविता आपल्याला भेटते. मानवाला जे जीवन वाट्याला आले त्या जीवनाचे एक चित्र उभे करतांना कवयित्री म्हणते,

'पालीच्या तोंडात पापुद्र्याचे
पंख गळून पडलेल्या
लिवलिवित किड्यासारखा / मानव वस्तीचा गोळा
काळ्याकुट्टदाट अंधाराच्या / जबड्यात अडकला'
(आकारणी, पृ. क्र. ६)

पालीच्या तोंडातील किड्यासारखा, मानववस्तीचा गोळा काळाकुट्टदाट अंधाराच्या जबड्यात अडकला आहे असे कवयित्रीला वाटते. पुढे कवयित्री युद्धजन्य चित्र रेखाटत असंख्य रणगाडे तिला दिसतात. रणकंदाच्या धामधुमीने विश्वविध्वंसक बॉम्बगोळ्यांनी भरभरून उभे ठाकले. एवढेच नाही तर,

'आग ओकून स्टेट करून/राख रांगोळी उरली थंडगार
या राखेतूनच आता नवीन / विश्व उभारणी आकारायची आहे
(आकारणी, पृ. क्र. ६)

अशा विपरित परिस्थितीतच कवयित्रीला नव्या विश्वाची उभारणी करायची आहे. 'ह्यात एकलव्यांनो', या कवितेत आशा माधव आत्मियतेने संवाद साधतात. त्या म्हणतात,

'ह्यात असलेल्या एकलव्यांनो....
आता तुम्ही तुमचे अंगठा कापून देण्याची
चूक करू नका...
तुमचा पूर्वज एकलव्य इमानदार होता,
शूर होता / पण उलटे काळीज ओळखण्याची प्रज्ञाच उगवली नव्हती रे..../ नाहीतर विसाव्या शतकापर्यंत रक्ताचे
पूर वाहिलेच नसते.....
(ह्यात एकलव्यांनो, पृ. क्र. १६)

पुढे कवयित्री म्हणते की,

'हातात हात घालून उभे व्हा, आणि
जोडा आपले धनुष्य बाण, लक्ष्य बनवा,
दिपवृक्ष लपला चार झालरी आड'
(ह्यात एकलव्यांनो, पृ.क्र. १६)

अशा प्रेरणा स्त्रोताला इतिहासातून बाहेर काढून नवा अर्थ शोधणारी कवयित्री आशा थोरात यांची कविता नवखेपणाच्या खुणा जात असलेली सामाजिक बांधिलकीच्या भूमिकेतून महत्त्वाची आहे. 'क्रांतीमा' या कवितेत ती सावित्रीबाई फुले यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करते.

'तुझ्या कारुण्य नेत्रातील पाझरणारे अश्रू
चांदण्याला जन्म देती,/ जातीच्या स्कंधावर विसावूनी
मानव्य दुःखाची तू सांगाती, / दीन दुबळ्यांची तू सावली
अनाथाची बाहुली, /तू विश्वाची माऊली
पंखात तुझ्या तृषार्त मने सुखावली / धुळीवर अक्षरी गिरवूनी तू
ज्ञानयोगीनी झाली / फुटक्या ललाटीची
मूकस्पंदने तू जाणली / वात्सल्यामयी तुझ्या कुशीने शार्दुलाला जन्म देऊन सागरगीते गाईली
(क्रांतीमा, पृ.क्र. १९)

अशी सावित्रीबाई फुले कवयित्रीला आपली प्रेरणा वाटते. तिच्या चरित्रातून प्रेरणा घेऊन नव्या जगात ती वावरते. स्त्री जाणिवेचा संयमी अविष्कार आशा थोरात कवितेत अविष्कृत करतात हे महत्त्वाचे आहे.

**सुरेखा भगत यांची कविता**

सुरेखा भगत ह्या पहिल्या पिढीतल्या कवयित्री आहेत. त्यांचा जन्म २६ डिसेंबर १९४९ मा शाळा, त्यांचा 'साक्ष' कवितासंग्रह प्रकाशित झालेला असून त्यांनी अस्मितादर्श, सिंहगर्जना, बहुजन संघर्ष, समुचित, लोकानुकंपा, महाराष्ट्र साहित्य पत्रिका, जयभीम, इत्यादी नियतकालिकातून लेखन केले आहे. जळगांव व औरंगाबाद आकाशवाणी वरून त्यांच्या कविता प्रसारित झालेल्या आहेत. 'साक्ष' या कवितासंग्रहाच्या प्रस्तावनेत केशव मेश्राम कवयित्रीच्या व्यक्तिमत्त्वाचा वेध घेतांना म्हणतात, "शोषितांच्या शिक्षित पिढीतही कवयित्रींची वाण आहे. आयुष्यातील अटळ अनुभवांचे आघात पचवून सोशिकतेने वाटचाल करणाऱ्या आणि शब्दांच्याच अटळ सावलीचीच सोबत निवडणाऱ्या व्यक्तिमत्त्वांपैकी आयु. सुरेखा भगत ह्या एक आहेत."२ सुरेखा भगत यांनी आपल्या लिहिण्यामागची प्रेरणा सांगितलेली आहे. त्या

ISSN : 2278-9308
September 2020

म्हणतात, "तुमची शिक्षण शिकून आराम आणि उच्च न्यायोचित कृतीची हवीच या जाणिवेने सामाजिक सहकारीसाठी सहभागी होऊ नये. असे अन्यायकारक स्त्रिया हिंदू संस्कृतीच्या शिवाय मानसिक गुलामगिरीच्या शिकार असतात, त्यात ते अशिक्षित शिवाय दलीतेचा अवमानात्मक धर्माला मानणाऱ्या असतात. एक स्त्री म्हणून समाजाची त्यांना ओळख नसती आणि खऱ्या अर्थाने त्यांना मानसिक शिकार व्हावा यासाठी फुले-आंबेडकरांच्या साहित्याचे आकलन केल्याशिवाय त्यांना पर्याय नाही हे मला वाटते."३ फुले-आंबेडकरांच्या साहित्यातून कवयित्रीला प्रेरणा मिळालेली आहे. याची स्पष्ट कबुली त्यांनी दिली आहे.

डॉ. गंगाधर पानतावणे यांनी सुरेखा भगत यांच्या कवितेचे वैशिष्ट्य नोंदवताना म्हटले की, "आंबेडकरवादी साहित्य निर्मितीचा भान ठेवावे लागते ते आपल्याला कविता लिहायची आहे याचे, पण त्याहीपेक्षा भान असावे लागते आपण आंबेडकरवादी आहोत याचे असे दुहेरी भान पेलणारे नि:संदिग्ध सामर्थ्य सुरेखा भगत यांच्या कवितेत आहे. त्यांच्या कवितेत बौद्धिक चमत्कृती नाही आणि पंडिती अहंकार नाही. काही तथाकथित आंबेडकरवादी विद्रोही कवी आपल्या नाहक पंडिती शब्दावडंबराने आंबेडकरवादी नितळ कवितेची नासाडी करीत आहेत. शब्दांचा फुगवटा आणि आशिक अतिशयोक्ती ही आंबेडकरवादी कवितेला जखमा करतात. याचे भान सुरेखा भगत यांना आहे आणि म्हणून त्यांची कविता अंत:करणाची भाषा बोलते. ती बौद्धिक कसरतीत अडकून पडत नाही. म्हणून ती मुखवट्याची कविता नाही. मुखवट्याची कविता हृदयीची कविता नसते. कोणी कितीही अडविले, दाबण्याचा प्रयत्न केला, शोषण्याचा, छिपण्याचा प्रयत्न केला तरी आतले तेजस्वीपण टिकवते."४ स्वत:चे तेजस्वीपण टिकविणारी सुरेखा भगत यांची कविता आहे. आजपर्यंत धर्मव्यवस्थेने स्त्रीला दुय्यमत्व बहाल केले आहे. या धर्मव्यवस्थेच्या संस्कृतीने तिला वस्तू म्हणून, तिला मन नसलेली म्हणून संबोधले आहे. तिला दासी म्हणून पाहिले आहे. परंतु आज मध्ये नवा बदल स्त्रीकडून आंबेडकरांची जीवनदृष्टी स्वीकारून भगत नवे आत्मप्रकटीकरण करताना दिसतात. त्या म्हणतात,

'काचेरी वस्तू म्हणून की काय
काचेच्या बांगड्यांचं तिच्यावर बंधन आलं,
काचघरातल्या बाहुलीसारखं राहणं आलं,
पण आपण काच नाही
हे तिला कळून चुकलं
काचेच्या बाहेर पडायला लागल्यापासून'
(बदल, पृ.क्र. ५८)

काचेच्या बंद चाकोरी बाहेरील हे कवयित्रीचे मनोगत आहे. तिला स्वत:चे भान आहे, स्वत:चे अस्तित्व आहे. स्वत:च्या स्वातंत्र्याची जाणीव आहे. त्यामुळे झालेला एक बदल ती अनुभव स्वरूपात व्यक्त करीत आहे. तो बदल कवितेच्या रूपाने मांडलेला दिसून येतो.

जग बदलाची आस कवयित्रीला आहे. जगात बदल झाला पाहिजे, तोही रक्तपाताशिवाय म्हणून त्या म्हणताना दिसतात,

'हातावरच्या रेषाच तेवढ्या बोलक्या असल्यावर
या हातांनी सारे जग बदलवून टाकले असते रक्तपाताशिवाय'
(तळहातांच्या रेषांनी पृ.क्र. २२)

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - ( (SJIF) -7.675, Issue NO, 243 (CCXLIII)
ISSN : 2278-9308
September 2020

त्या पुढे म्हणतात की,
'हे शतक कुठले बरे? हा प्रदेश कुठला बरे?
कुठली लक्षणं मिरवित आहे अंगावर दा देश?
का नाही वेसण घातली इतिहासाला /
या भविष्याने, ज्योतिष्याने?/
का नाही टळली महायुद्ध?
का नाही थांबले मातांच्या-भगिनींच्या
कपाळावरील कुंकू पुसण्याचे?
का नाही थोपविले धर्माच्या नावाखाली
रंगलेले रणकंदन?'
(तळहातांच्या रेषांनो! पृ.क्र. २२-२३)

असा शोषणाचा, धर्माच्या नावाने नागवलेला इतिहास कवयित्रीला माहीत आहे. म्हणून तो बदलण्याची, नवा बदल घडविण्याची अपेक्षा कवयित्रीला आहे. म्हणून एका व्यापक
संवेदनेवर जगाची निर्मिती व्हावी, व्यापक समाजहिताची करूणा माणसाच्या अंतःकरणात जागावी, असे कवयित्रीला वाटते, म्हणून ती म्हणते,

'माणसानं एकोप्यानं जिंदादिलानं राहावं
जसं एका डोळ्यात खुपलं / तर दुसऱ्यात चटकन् पाणी यावं तसं,
मग असं का होत नाही? / असं व्हायला हवे
डोळ्यांना - डोळ्यांसाठी / डोळ्यांत तेल घालून राहायला हवं!'
(असं व्हायला हवं! पृ.क्र. २७)

अशी व्यापक समाजहिताची कवयित्रीची भूमिका आहे. समतेच्या बंधुतेच्या सुंदर सहजीवनाची अपेक्षा कवयित्रीला आहे. म्हणूनच ती समाजविघातक कृत्यामुळे व्यथित होते. तिच्या अंतःकरणात प्रचंड दुःख दाटून येते आणि तिला त्वेषाने म्हणावे लागते,

'नराधमांनो,
'वा! वाः काय तुमची हुशारी,
काय तुमची इमानदारी !
फुले काय, आंबेडकर काय
सारेच तुम्ही चीत केले.'
(नराधमांनो, पृ.क्र. ३६)

नामांतरच्या वेळी अमानुषता उफाळल्याने कवयित्रीने समाजाच्या विसंगतीवर त्वेषाने प्रहार केला आहे. 'कुणाच्या कत्तलीने प्रश्न कधीच सुटत नाही असे तिला माफक वाटते आहे. कत्तली करून प्रश्न सुटणार नाही तर 'द्वेषाला प्रेमानेच व रागाला लोभानेच, जिंकता येते, जिंकता येते,' असे तिला वाटते. समाजात नामांतराच्या निमित्ताने जी जातीय तेढ निर्माण झाली त्यातून माणूसकी कशी पराजित झाली हे कवयित्री अत्यंत उपरोधाने व्यक्त करून प्रेमानेच मार्ग निघेल असा दृढआशवाद कवयित्री जवळ आहे.

**नंदा तायवाडे यांची कविता**

नंदा तायवाडे दलित-आदिवासी-मुस्लीम स्त्रियांच्या सामाजिक चळवळीत सक्रीय असलेल्या दलित कवयित्री आहेत. 'अण्णाभाऊ साठे मत' या मासिकाच्या संपादक म्हणूनही त्यांनी कार्य केले आहे. वडील रोडबाजी तायवाडे बैंडपथकात काम करीत होते. अनेक साहित्य संमेलन व कवी संमेलनातून त्यांनी कविता वाचन व प्रबोधन केले आहे. मुंबई विद्यापीठाने एम. ए. च्या अभ्यासक्रमासाठी २००८ साली प्रकाशित केलेल्या 'तिच्या जगण्याच्या वेणा' या कवितासंग्रहात त्यांची 'दोस्त' ही कविता समाविष्ट आहे. 'अस्मितादर्श', 'सुगावा' या नियतकालिकांत कविता प्रकाशित झाल्या असून 'तिच्याविना ह्या प्रतिनिधिक काव्यसंग्रहातदेखील त्यांच्या कविता प्रकाशित झाल्या आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे कवयित्रीचे प्रेरणास्त्रोत आहे. 'भीमराव रामजी आंबेडकर' ह्या कवितेत त्या म्हणतात,

'दाही दिशा आग ओकत नि तुटून पडत आकाश अंगावर आसुडांनी उगारलं थोरपण जिर्ण झाल्या देहावर
दुःखाला नव्हते कुणीच वाली व्यथांचे अनाथपण भणभणत होते
मूळ धरू दिले नाही धरणीने गावकूस तसेच सडत होते....

तथागतशरणाने तुझ्या सारे विश्व स्तंभित झाले
जळातळाचे अंतःस्वर पहा कसे निनादून गेले
वर्तमानबुडवे-पहाटपळवे क्षणात सारे पसार झाले
निजिर्ण झाल्या दाराशी ममतेचे फूल आले....

तू आलास वादळी नि आयुष्य तारांगण झाले
युगायुगाचे देणेघेणे तेव्हा क्षणीच थिजून गेले
तुझ्या लख्खतेने येथे सूर्यही ओशाळला
दवा धरला काळोख डोळे मिटून पळाला....
*_(भीमराव रामजी आंबेडकर, पृ.क्र. ५)_*

कवयित्री प्रेरणा डॉ. आंबेडकर असल्यामुळे कवयित्री स्वतःला आंबेडकरी अनुयायी मानते कारण सर्वगामी मानव्याला आता तुझीच आस आहे. असा ठाम विश्वास आंबेडकरांच्या संघर्षशील जीवनात कवयित्रीला दिसून येतो. तू वादळात आलास आणि आयुष्य तारांगण गले तसेच तुझ्या तेजाने सूर्यही झाकाळला असल्याची जाणीव कवयित्रीला होते.

कवयित्री सावित्रीबाई फुले शी संवाद साधताना हे रणरागीणी' ह्या कवितेत म्हणतात,

'मायमाऊलीचा जन्मच ठरविला होता साजिया-बाजिंयांनी
पूर्वजन्मीच्या पापाचं मूळ, सर्वत्र पसरलेली शोककळा कुलटा, पायातलं पायतान,/घरादारात अवकळा
- कैद करा घराच्या तुरुंगात, चार भिंतीच्या बराकीत कोंबा
- खेळता खेळता करा तिला पतिव्रता, विधवा
- कापा डोकीचे केसं, धगधगत्या चितेत पतीच्या सरणात गुमान लोटा
तिच्यासाठी असे फर्मान होते

[illegible]

संस्कृती निर्माण व्हावी म्हणून प्रयत्नरत आहे. जीवना विषयी प्रचंड उत्कटता या कवितेने व्यक्त केली आहे.

ही कविता कल्पनाप्रवणतेच्या प्रांतात रमणारी नाही किंवा तिला रोमँटिक जगाचीही ओढ नाही. जीवनानुभवाच या कवितेचे अंग आहे. जे-जे भोगावं, अनुभवावं, साहिलं त्याचाच उत्कट असा अविष्कार या कवितेचा प्राण आहे. या कवितेला सामाजिक बांधिलकीचं अंग आहे तसेच सत्याला गवसणी घालण्याचाही अट्टाहास आहे. माणसा-माणसांतील भेद मिटून जिथे समता नांदावी, दुसऱ्याचे दुःख आपलेच वाटावे एवढी संवेदना माणसात निर्माण व्हावी असे तिला वाटते. एकूणच मराठी दलित कवितेत विदर्भातील दलित कवितेची अभिव्यक्ती आशयपूर्ण असून दलित साहित्याचे विद्रोह, नकार आणि आपल्या सृजनाचे नवे सामाजिक भान व्यक्त करणारी कविता आहे. त्यामध्ये दलित कवयित्रींचेही मोठेच योगदान आहे. स्त्रियांच्या वाट्याला आलेल्या दुःखाची परिणामकारकता दलित कवयित्रीने आपल्या काव्यातून व्यक्त केली आहे. स्त्रियांना जीवा,आनंदानी ,अवहेलना,वेदना आणि अपेक्षा का भोगावी लागते, याचे सूक्ष्म आत्मनिरीक्षण दलित कवयित्रीने प्रभावीपणे मांडले आहे. एकूणच साठोत्तरी दलित कवितेच्या निर्मितीत कविसोबत कवयित्रींनीही भान ठेवत आणि स्वदुःखापेक्षाही दलित स्त्रीचे दुःख तिने समाजाच्या वेशीवर टांगले आहे.

संदर्भ :

१) ज्योती लांजेवार : अजून वादळ उठले नाही,क्रांतिपर्व प्रकाशन पुणे, २००५,पृ.क्र. अनुक्रमे.

२) सुरेखा भगत: साक्ष,प्रशांत प्रकाशन ,बुलढाणा,१९९८, पृ.क्र.मलपृष्ठ.

३) तत्रैव, पृ.क्र. ४२

४) तत्रैव, पृ.क्र. १७